# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे-४११००४

## प्रकटन

**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे यांचे कडून इतर मंडळे/संस्था यांना देण्यात येणा-या समकक्षता कार्यवाही बाबत.**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे ही एक स्वायत्त संस्था असून या द्वारे इ.१० वी व इ. १२ वी ची परीक्षा घेतल्या जातात. महाराष्ट्र राज्याच्या या बोर्डाकडे समकक्षता (equivalence) मिळणेसाठी इतर संस्था/बोर्ड प्रस्ताव सादर करतात. सदर प्रस्तावाची पडताळणी करून संबधित संस्था/बोर्ड यांना इ. १० वी व इ. १२ वी समकक्षतेबाबत मान्यता प्रदान करण्यात येते. उपरोक्त प्रमाणे समकक्षतेबाबत मान्यता देण्यात आलेल्या संस्था / बोर्ड यांची मान्यताप्राप्त यादी मंडळाच्या www.mahahsscboard.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली आहे.

तरी महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांच्या कडून इतर संस्था / बोर्ड यांना समकक्षता देण्यात आलेल्या अधिकृत यादीची सर्व मान्यताप्राप्त शाळा, कनिष्ठ महाविद्यालये, विद्यार्थी / पालक व नागरिकांनी नोंद घ्यावी.

(देविदास कुलाळ)
सचिव
राज्य मंडळ,पुणे -४

दिनांक १३/१०/२०२५

पृष्ठांकन क्र.अविमं. / उमाप/ १५६०
दिनांक -14 /10 /2025
१६/१०/२५

प्रती ,
प्राचार्य,
सर्व मान्यता प्राप्त कनिष्ठ महाविद्यालय,
अमरावती विभाग, अमरावती.

विषय :— महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांचेकडून इतर मंडळे/संस्था यांना देण्यात येणा—या समकक्षता कार्यवाही बाबत....

संदर्भ :— राज्य मंडळ, पुणे यांचे प. क्र. /रा. मं./संशोधन/३४८१, दिनांक — १३/१०/२०२५

उपरोक्त पत्राचे अवलोकन करून महाराष्ट्र राज्याच्या बोर्डाकडे समकक्षता मिळणेकरीता अर्ज सादर करणेबाबत आपल्या स्तरावरून विद्यार्थी व पालक यांना अवगत करून देण्यात यावे.

(जयश्री राऊत)
विभागीय सचिव,
अमरावती विभागीय मंडळ, अमरावती.